प्रेस नोट

दिनांक ११/०७/२०२४

श्री.विनायक रामचंद्र भोवड, मुख्य लिपिक, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था तथा सावकारांचे निबंधक, रत्नागिरी, ता.जि.रत्नागिरी यांना तक्रारदार यांचेकडुन लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांनी ताब्यात घेतले.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक / पोलीस ठाणे | रत्नागिरी शहर पोलीस ठाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.विनायक रामचंद्र भोवड, वय ५७ वर्षे, मुख्य लिपिक, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था तथा सावकारांचे निबंधक, रत्नागिरी, ता.जि.रत्नागिरी. |
| मागणी केलेली लाच रक्कम | ५०,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाच रक्कम | ५०,०००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार यांचे सावकारी लायसन्सचे काम करुन देण्यासाठी वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे स्वत:साठी व डीडीआर ऑफिसला देण्यासाठी ५०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याबाबत ला.प्र.वि. रत्नागिरी येथे तक्रार प्राप्त झाली होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २६/०६/२०२४ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये वरील नमुद लोकसेवक यांनी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने ला.प्र.वि. रत्नागिरी यांनी दिनांक ११/०७/२०२४ रोजी सापळयाचे आयोजन करुन लोकसेवक भोवड यांना तक्रारदार यांचेकडुन ५०,०००/- रुपये लाचेची रक्कम स्वीकारताना दिनांक ११/०७/२०२४ रोजी ११.५६ वाजता सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था तथा सावकारांचे निबंधक, रत्नागिरी, ता.जि.रत्नागिरी यांना रंगेहाथ पकडण्यात आले. तपास सुरु आहे. |

मार्गदर्शन अधिकारी

१) मा.श्री.सुनिल लोखंडे, पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
२) मा.श्री.महेश तरडे, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.
३) मा.श्री.गजानन राठोड, अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया अँन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमाकावर संपर्क साधावा.

**Toll Free No** :- 1064
**Telephone No** :- 02352/222893, Mobile No. 7507417072,7774097874
**Office email** :- acbratnagiri@gmail.com
**Website** :- www.acbmaharastra.gov.in
**Mobile App** :- www.acbmaharastra.net
**Facebook Page** :- www.facebook.com/MaharastraACB

(अनंत कांबळे)
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी.